# उपनिबंधक सहकारी संस्था पी विभाग, मुंबई

**रुम नं. ३०३, तिसरा मजला अे विंग, बी. एम. सी. गोडावुन बिल्डिंग, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ठाकुर कॉम्प्लेक्स,
९० फुट रोड, कांदीवली (पुर्व) मुंबई ४०० १०१.**

---

जा. क्र. मुंबई/उपनि/पी विभाग/८३(१)आदेश/बी-१/ ८६१ /२०१८
दिनांक :-०८/०३/२०१८

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) अन्वये आदेश

**वाचावे :-** १) महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम ८३(१) मधील तरतूदी.
२) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (४), मुंबई यांनी त्यांचेकडील जा. क्र. मुंबई/जिऊनि-४/(८१/६)/फेर लेखापरिक्षण/मालाड ब्रिजल/२०२/२०१७ दिनांक १६/०२/२०१७ चा आदेश
३) श्री. के. एन. कासार - लेखापरिक्षक श्रेणी - २ सहकारी संस्था नागरी बँका - ३ यांचा दि. ०२/०५/२०१७ चा लेखापरिक्षण अहवाल.

ज्याअर्थी, **द मालाड बिजल को-ऑप. हौ. सोसा. लि., सीटीएस नं. ३०७/२२अे, ऑफ मार्वे लिंक रोड, एव्हरशाईन नगर, मालाड (प), मुंबई - ४०० ०६४** या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनुसार झालेली असून सदरची संस्था या कार्यालयाच्या अधिकार कक्षेमध्ये येते आणि,

ज्याअर्थी, सदर संस्थेचे दैनंदिन कामकाज हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ संस्थेची नोंदणीकृत उपविधीतील तरतुदीनुसार व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकेनुसार चालविणे संस्थेस बंधनकारक आहे. आणि.,

ज्याअर्थी, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (४), मुंबई यांनी त्यांचेकडील जा. क्र. मुंबई/जिऊनि-४/(८१/६)/फेर लेखापरिक्षण/मालाड ब्रिजल/२०२/२०१७ दिनांक १६/०२/२०१७ च्या आदेशान्वये श्री. के. एन. कासार - लेखापरिक्षक श्रेणी - २ सहकारी संस्था नागरी बँका - ३ यांची संस्थेचे सन २०१४-२०१५ या वर्षाचे फेर लेखापरिक्षण करण्याकरिता नेमणूक केलेली होती. त्यांनी वरील संस्थेचे सन २०१४-२०१५ या वर्षाचे फेर लेखापरिक्षण करुन संदर्भ क्र. ०३ अन्वये लेखापरिक्षण अहवाल या कार्यालयात सादर केला असता सदर अहवालात गंभीर स्वरुपाच्या बाबी आढळून आलेल्या आहेत.

वरील परिस्थिती विचारात घेता संस्थेच्यावतीने मागणी केल्यानुसार संस्थेची रचना तिचे कामकाज तसेच आर्थिक स्थिती यावरुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१)

खाली चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झालेली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, जे. डी. पाटील, उपनिबंधक, सहकारी संस्था पी विभाग, मुंबई याद्वारे **द मालाड बिजल को-ऑप. हौ. सोसा. लि., सीटीएस नं. ३०७/२२अे, ऑफ मार्वे लिंक रोड, एव्हरशाईन नगर, मालाड (प), मुंबई - ४०० ०६४** या संस्थेच्या संदर्भात परिशिष्ट - अ मधील मुद्दयावर चौकशी करणेकामी **श्री. सी. एच. कदम - निवृत्त सहाय्यक निबंधक** यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करत आहे. त्यांनी ०३ महिन्यांच्या आत चौकशी करुन चौकशी अहवाल कार्यालयास सादर करावा. चौकशीपोटी रु. १५,०००/- जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (४), मुंबई या कार्यालयाचे खात्यात जमा करावा.

हा आदेश आज दिनांक ०३ /०३/२०१८ माझे सहीने व या कार्यालयाचे मुद्रेसह दिला आहे.

(जे. डी. पाटील)
उपनिबंधक,
सहकारी संस्था पी विभाग, मुंबई

**प्रत :-**

१) चेअरमन/सेक्रेटरी, **द मालाड बिजल को-ऑप. हौ. सोसा. लि., सीटीएस नं. ३०७/२२अे, ऑफ मार्वे लिंक रोड, एव्हरशाईन नगर, मालाड (प), मुंबई - ४०० ०६४.**

आपणांस कळविण्यांत येते की, त्यांनी चौकशी फी पोटी वरील रक्कम जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (४), मुंबई, भंडारी बँक इमारत, दुसरा माळा, प्र. ल. काळे गुरुजी मार्ग, दादर (प), मुंबई - ४०० ०२८.

२) श्री. सी. एच. कदम - निवृत्त सहाय्यक निबंधक.

आपणांस कळविण्यांत येते की, परिशिष्ट - अ मधील मुद्दयांची ०३ महिन्यांच्या आत चौकशी करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपनिबंधक,
सहकारी संस्था पी विभाग, मुंबई

RECEIVED SOC. COPY-
SECY.
11/3/2018

17/03/2018